संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेतील योगविचारांचे विश्लेषणात्मक अध्ययन

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायांतर्गत

Ph.D उपाधीसाठी सादर करावयाच्या

प्रबंधाची संक्षिप्त रूपरेखा

संशोधिका

स्वराली बाळासाहेब जोशी

मार्गदर्शिका

प्रा.डॉ. कलापिनी अगस्ती,

विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग,

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक

२०२४

अनुक्रमणिका

१. प्रस्तावना	३
२. विषयाची आवश्यकता	४
३. पूर्व संशोधनाचा आढावा	५,६
४. उद्दिष्ट्ये	७
५. व्याप्ती आणि मर्यादा	७
६. गृहितके	७
७. संशोधन पद्धती	७
८. प्रकरणांची विभागणी	८
९. निष्कर्ष व उपसंहार	९
१०.संदर्भग्रंथ सूची	९

संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेतील योगविचारांचे विश्लेषणात्मक अध्ययन.

- **प्रस्तावना**

महाराष्ट्राला बुद्धीची श्रीमंती आणि आत्मसाक्षात्काराचे वैभव भरपूर लाभले आहे. आत्मसाक्षात्काराची ही परंपरा पुरातन काळापासून आजतागायत अखंड चालत आली आहे. प्राचीन काळापासून अनेक थोर ज्ञानीजनांनी महाराष्ट्र भूमीला त्यांच्या पादस्पर्शांनी पवित्र केले आहे. या विभूतींनी त्यांना प्राप्त असलेले दिव्य ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत त्यांच्या वाङ्मयाच्या रुपात पोहोचवले. दत्त पंथ, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव पंथ, रामदासी संप्रदाय अशा अनेक संप्रदायांनी समाज प्रबोधन केले आहे. वारकरी संप्रदायानी किर्तनाद्वारे, अभंगांद्वारे जनजागृती करण्याचे कार्य केले आहे. त्यांनी प्रपंचात राहून परमार्थ गाठला आणि जनसामान्यांनाही त्या सर्वोच्च शिखरापर्यंत जाण्याचा मार्ग दाखवला. सर्वसामान्यांच्या मनावर ठसा उमटवणारी, असामान्य अशी हि वारकरी परंपरा आहे. या वारकरी परंपरेतील संतानी दिलेले ज्ञान अमृततुल्य असून ते आज हि अमर आहे.

योग ही भारतातील हजारो वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. योग हा शब्द 'युज्' या धातूपासून बनला आहे. 'युज्' म्हणजे जोडणे. जीव(आत्मा) व परब्रह्म(परमात्मा) यांचे मिलन म्हणजेच योग. हा योग जेव्हा साधल्या जातो तेव्हा तो मनुष्य कैवल्य प्राप्त करतो. मोक्षप्राप्तीचे अनेक मार्ग भारतीय परंपरेत सांगितलेले आहे. कर्मयोग,ज्ञानयोग, भक्तियोग,हठयोग,राजयोग,लययोग,नादयोग हे त्यांच्या पैकी काही होय. संतसाहित्यातही या योग संप्रदायांविषयी चिंतन केलेले आढळते. वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वरांपासून या योग तत्वज्ञानाचा पाया उभारलेला आहे. पुढे याची जबाबदारी संत तुकाराम, संत एकनाथ, यांसारख्या संतांनी घेतली. त्यांच्या अभंगगाथांमधून आपल्याला त्यांचे चरित्र, स्वभाव वैशिष्ट्ये, त्यांची तत्कालीन परिस्थिती कळतेच पण त्यातूनच तत्वज्ञानाची बैठक, तसेच त्यांचे योग विषयक चिंतन देखील आढळते.

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या पेक्षा संत एकनाथांच्या काळात महाराष्ट्रातील समाज स्थिति अज्ञानी, दु:ख, दारिद्र्य यांनी भरलेली होती. अशा परिस्थितीत ज्ञानाच्या प्रचारार्थ संत एकनाथांनी अभंगरचना केल्या. सर्वसामान्य मनुष्याला मोक्षमार्ग दाखवला. 'ज्ञानाचा एका' अशी वारकरी संप्रदायात ज्यांची ख्याती आहे असे संत एकनाथ त्यांच्या साहित्यामधून अध्यात्मनिरुपण करतात. त्यांनी चतु:श्लोकी भागवत, नाथभागवत, रुक्मिणीस्वयंवर, भावार्थ रामायण हे प्रौढ स्वरूपाचे ग्रंथ लिहिले. संत बहिणाबाई भागवत मंदिराची कल्पना करताना म्हणतात,"जनार्दनी एकनाथ | खांब दिला भागवत".संत एकनाथांनी ज्ञानेश्वरांच्या शिकवणीला उजाळा देण्याचे महत्वाचे कार्य केले. संत एकनाथांचे जीवन अत्यंत खडतर होते तरीही त्यांनी प्रपंचात राहून योग मार्ग साधला. नाथांनी त्यांच्या रचनांमध्ये नित्य व्यवहारातही अध्यात्म गुंफले आहे. त्यांच्या अभंगगाथेमधून त्यांनी त्यांच्या जीवनात योगाला कसे स्थान दिले?, त्यांच्या योगचिंतनाची शैली कशी आहे?, याविषयी अभ्यास प्रबंधात करण्यात येईल.

- **विषयाची आवश्यकता**

पदव्युतर शिक्षण घेत असताना 'आधुनिक योगी' असा अध्ययनाचा विषय होता. तेव्हा सगळ्या संत,महर्षींचा परिचयात्मक अभ्यास झाला होता. महाराष्ट्राला प्रदीर्घ संत परंपरा लाभलेली आहे. त्यामधील संत एकनाथांनी त्यांच्या अभंगगाथांमध्ये जे योग विचार मांडले, त्यांच्या विषयी ओढ निर्माण झाली. अभंगातील योगचिंतनावर अधिक सखोलतेने अभ्यास करावा अशी इच्छा असल्यामुळे Ph.D संशोधन विषय म्हणून संत एकनाथांच्या अभंगातील योगचिंतन अभ्यासावे असे वाटल्याने सदर विषयाची निवड करण्यात आली.

संत एकनाथांवर अनेक संशोधकांनी आपले विचार मांडले आहेत. परंतु यांच्या अभंगगाथेतील योगचिंतन मांडलेले आढळले नाही. त्या विषयावर सखोल अभ्यास करायला हवा असे वाटले. म्हणून हा भाग येथे Ph.D संशोधनासाठी निवडला आहे. कर्म-ज्ञान-भक्तियोग अशा विविध बिंदुंनी या अभंगगाथेचा अभ्यास केला जाऊ शकतो. त्यांच्या अभंगगाथेमध्ये योग्यशास्त्रातील विविध संप्रदायांच्या सिद्धांतांचाही उल्लेख आढळतो. या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर संत साहित्याचा अभ्यास सर्वांसमोर यावा असा या अध्ययनाचा हेतू आहे. संत एकनाथांचे साहित्य प्रचंड आहे. परंतु त्यांच्या अभंगगाथांमध्ये त्यांनी विविध योग संप्रदाय कसे मांडले आणि योगशास्त्रात त्यांचे कसे योगदान लाभले हे अभ्यासण्याचा उद्देश्य या संशोधनाचा राहील.

- **पूर्व संशोधनाचा आढावा**

१.संत साहित्य में योगसाधना

श्रीवास्तव सतीश कुमार लाल, महात्मा गांधी काशी विद्यापीठ, १९९७

या संशोधनात हिंदी साहित्यातातील संतांचा विचार केला गेला आहे. संत कबीर, संत गुरु नानक, संत सिंग जी, संत चरण दास, संत तुलसीदास, यांची भक्ती कर्म आणि ज्ञान योग अशी त्रय योग साधना पंचम अध्यायात सांगितलेली आहे.

२.संतो में योग मार्ग कि प्रासंगिकता

आर. शर्मा जवाहरलाल , वी. बी.एस. पुर्नाचाल युनिवरसिटी, १९९६

या संशोधानात हिंदी संत साहित्याचा विचार केला आहे आणि त्यांची गुप्त संत, प्रकट संत अशी विभागणी करून त्यांच्या साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

३.एकनाथी भारुड एक चिकित्सक अभ्यास

टेंबे शिला भास्कर ,युनिवरसिटी ऑफ मुंबई, १९९०

भारुड या काव्यप्रकाराचे विवेचन करून भारुडांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न या प्रबंध लेखनात केला आहे. भारुडांचे सामाजिक आध्यात्मिक,वाङमयीन महत्व सांगितले.

४.मराठी संत साहित्यातील मानवतावाद संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या संदर्भात

धनगर डी. टी.,नॉर्थ महाराष्ट्र युनिवरसिटी, २०१७

किर्तन परंपरेच्या माध्यमातून मानवतावादी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या प्रबंधातून केलेला दिसून येतो.

५.संत साहित्यातील कल्याणच्या अर्थशास्त्राचा एक तौलनिक अभ्यास विशेष संदर्भ संत तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ व नामदेव

दादाराव माने दिलीप, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिवरसिटी, २०१०

या प्रबंधात महाराष्ट्रातील संत साहित्याचा आढावा, संत एकनाथांचे कल्याणविषयक विचार मांडण्यात आलेले आहेत.

६.संत एकनाथांच्या वाङमयातून व्यक्त होणाऱ्या वैश्विक मानवी मूल्यांचे चिकित्सक अध्ययन

निवडे शारदा विजय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिवरसिटी, २०२३

संत एकनाथांचे जीवन, कार्य, वैश्विक मानवी मूल्य संकल्पना, त्यांच्या वाङमयातील या संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास, त्यांच्या वाङमयातील समाजदर्शन या प्रबंधात मांडले आहे.

७.संत एकनाथ विषयक प्रकाशित ग्रंथ वाङमयचे समालोचन

देवकर वर्षा विनायक , सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी, २००६

संत एकनाथांचे चरित्र, एकनाथी भागवत, भावार्थरामायण, रुक्मिणी स्वयंवर, स्फुटरचणा, अभंगवणी, भारुड यांचा समालोचनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

८.संत एकनाथकृत स्फुट प्रकरणे एक विवेचनात्मक अभ्यास

तांदळे ज्ञानेश्वर बालकृष्ण, सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी,१९९२

चतु:श्लोकी भागवत, हस्तमालक, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुष्काटक, आनंदनुभव, अमृतानुभव, चिरंजीवीपद ही स्फुट प्रकरणे निवडली आहेत.

९.संत एकनाथांचे रुक्मिणी स्वयंवर एक चिकित्सक अभ्यास

घराट पदमाकर गणपत, युनिवरसिटी ऑफ मुंबई, १९९७

रुक्मिणी, श्रीकृष्ण, रुकमी, शुद्धिमाती, सुदेव, शिशुपाल, बलराम यांचे भावना चित्रण केलेले आहे.

10.Philosophy in the literature of bharud with special reference to saint Eknath

देखणे आर. ए., सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी, १९८५

संत एकानाथांनी भारुडा मधून मांडलेले तत्वज्ञान व रुपकांचे स्पष्टीकरण आणि तात्विक समालोचन या प्रबंधात करण्यात आलेले आहे.

११.एकनाथपंचक एक सर्वांगीण अभ्यास

तांबे सुनीता सदानंद, सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी, १९९८

एकानाथांची प्रभावळ, राम जनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानानंद, दासोपंत यांच्या विषयी विश्लेषण करून एकनाथ पंचकातील रचनांचे वाङमयीन व भाषिक विश्लेषण केले आहे.एकनाथ पंचक आणि ईतर संतांच्या पंचकातील संबंध दर्शवला आहे.

१२. संत एकनाथांच्या अभंगांचा लोकतत्वीय अभ्यास

साबणे अपर्णा अशोक, सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी, २००७

संत साहित्यातील लोकतत्वीय अभ्यासाची आवश्यकता, संत एकनाथांच्या अभंगातील दैवकथांचा अभ्यास संत एकनाथांच्या अभंगातील संत चरित्रपर कथा, संत एकनाथांच्या अभंगातील लोकजीवन व लोकसंस्कृती, संत एकनाथांच्या अभंगातील रचनाविशेष अशा बिंदुनि अभ्यास केलेला आहे.

१३. संत एकनाथांच्या भारुडातील लोकतत्व आणि ईहवाद

लावंगे स्वाती वासुदेव, सावित्रीबाई फुले पुणे युनिवरसिटी, २०२३

भारुडे, लोकतत्व, आणि ईहवाद या संकल्पना स्पष्ट करून संत एकनाथांच्या भारुडातील लोकतत्वे आणि ईहवाद यांचा परस्पर अनुबंध लावण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे, संत साहित्यावर वेगवेगळ्या आयामांनी अभ्यास झाला आहे. परंतु संत एकनाथांच्या अभंग गाथेतील योगचिंतनावर अद्याप अभ्यास झालेला आढळलेला नसल्यामुळे या विषयाची निवड करण्यात आली आहे.

- **उद्दिष्ट्ये**

१.संत एकनाथांच्या अभंगगाथेमधील योगचिंतनाचा अभ्यास करणे.

२.संत एकनाथांच्या अभंगगाथेमधील अभंगांच्या पार्श्वभूमीवर विविध योगसंप्रदायांचा अभ्यास करणे.

३.संत एकनाथांनी योगशास्त्राला दिलेले योगदान जाणून घेणे.

४.वारकरी संप्रदायातील योगचिंतन जाणून घेणे.

- **व्याप्ती आणि मर्यादा**

वारकरी संप्रदायाची संत परंपरा अत्यंत व्यापक आहे. परंतु येथे त्यांच्या मधील संत एकनाथांच्या साहित्यातील अभंगगाथेवर प्रकाश टाकला जाईल. त्यांच्या अभंग रचनांमधून मांडलेले तत्वज्ञान खूप व्यापक आहे तरी येथे प्रामुख्याने कर्म-ज्ञान-भक्तीयोग या तीन मार्गांचा विचार करण्यात येईल. या व्यतिरिक्त योग मार्गांचा उल्लेख आढळल्यास त्याचा ही अभ्यास करण्यात येईल.

संत एकनाथ महाराज अभंगगाथेतील अभंग संख्या – ४००१

- **गृहीतके**

१.संत एकानाथांच्या अभंगगाथेमध्ये योगचिंतन मांडले आहे.

२.योगशास्त्रात सांगितलेल्या सिद्धांतामध्ये आणि संत एकनाथांनी सांगितलेल्या मोक्ष मार्गामध्ये साधर्म्य आढळते.

३.संत एकनाथांनी योगशास्त्रातील विविध संप्रदायांचा विचार अभंगगाथेत मांडलेला आहे.

४.संत एकनाथांनी योगशास्त्राला योगदान दिले आहे.

- **संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक किंवा वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. अभंगगाथांमधील जे विषयानुशंगीक अभंग असतील त्यांचा अभ्यास करण्यात येईल. योगशास्त्रातील संकल्पनांचा आणि अभंगांमधील सिद्धांतांचा अभ्यास तुलनात्मक पद्धतीने करण्यात येईल.

- **प्रकरणांची विभागणी**

प्रस्तावना –

या प्रकरणामध्ये विषयाची पार्श्वभूमी मांडण्यात येईल.

१.प्रकरण पहिले - महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा परिचय

महाराष्ट्राला संत परंपरेचा वारसा लाभला आहे. ही परंपरा वेगवेगळ्या संप्रदयामध्ये विस्तृत झाली आहे. अनेक संप्रदायांपैकी काही प्रातिनिधिक संप्रदायांचा परिचय येथे करून देण्यात येईल. प्रामुख्याने वारकरी संप्रदायाची ओळख, संत परंपरा, त्यांचे दार्शनिक विचार, योगविचार यांची विस्तृतपणे माहिती देऊन विषय प्रवेश करण्यात येईल.

२.प्रकरण दुसरे - संत एकानाथ महाराजांचा परिचय

संत एकनाथ महाराजांची ओळख, त्यांचा कार्यकाळ, वारकरी संप्रदायातील त्यांचे योगदान, तसेच त्यांची समग्र साहित्यसंपदा उदा. एकनाथी भागवत, भावार्थरामायण, रुक्मिणी स्वयंवर, स्फुटरचणा, अभंगवणी, भारुड यांच्या विषयी विस्तृत माहिती देण्यात येईल. संत एकनाथ महाराजांचा परिचय व त्यांच्या समग्र साहित्याची ओळख या प्रकरणात संक्षिप्त स्वरूपात करून देण्यात येईल.

३.प्रकरण तिसरे - संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेमधील कर्मयोग विषयक चिंतन

या प्रकरणामध्ये पातंजल योगसुत्र आणि श्रीमद्भगवद्गीतेमध्ये वर्णित कर्मयोग विषयक विश्लेषण करून संत एकनाथांनी त्यांच्या अभंगगाथेमध्ये सांगितलेल्या कर्मयोगाचे स्वरूप यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. संत एकनाथ यांचे कर्मयोग विषयक चिंतन येथे मांडण्यात येईल.

४.प्रकरण चौथे - संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेमधील ज्ञानयोग विषयक चिंतन

या प्रकरणामध्ये पातंजल योगसुत्र आणि श्रीमद्भगवद्गीतेमध्ये वर्णित ज्ञानयोग विषयक विश्लेषण करून संत एकनाथांनी त्यांच्या अभंगगाथेमध्ये सांगितलेले ज्ञानयोगाचे स्वरूप यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. संत एकनाथ यांचे ज्ञानयोग विषयक चिंतन येथे मांडण्यात येईल.

५.प्रकरण पाचवे - संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेमधील भक्तियोग विषयक चिंतन

या प्रकरणामध्ये पातंजल योगसुत्र आणि श्रीमद्भगवद्गीतेमध्ये वर्णित भक्तियोग विषयक विश्लेषण करून संत एकनाथांनी त्यांच्या अभंगगाथेमध्ये सांगितलेले भक्तियोगाचे स्वरूप यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. संत एकनाथ यांचे भक्तियोग विषयक चिंतन येथे मांडण्यात येईल.

६.प्रकरण सहावे - संत एकनाथ महाराजांच्या अभंगगाथेमध्ये प्रतिपादित अन्य योग संप्रदायांचे विश्लेषण

कर्म-ज्ञान-भक्तियोग या व्यतिरिक्त योगमार्गांनीही मोक्ष प्राप्ती होते. या प्रकरणामध्ये संत एकनाथांच्या अभंगगाथेमध्ये कर्म-ज्ञान-भक्तियोग यांच्या व्यतिरिक्त योग संप्रदाय आढळल्यास त्या योगसंप्रदायांचा अभ्यास करण्यात येईल. त्या योगसंप्रदायांचा अभ्यास संत एकनाथांच्या अनुषंगाने येथे केला जाईल.

७.प्रकरण सातवे – संत एकनाथांचे योगशास्त्राला योगदान

वरील सहा प्रकरणाच्या आधारे संत एकनाथांनी योगशास्त्राला दिलेले योगदान या प्रकरणामध्ये मांडण्यात येईल. कर्म-ज्ञान-भक्तियोग संप्रदायांच्या संकल्पना संत एकनाथांनी कशाप्रकारे मांडल्या आहेत. त्यामुळे योगशास्त्र विषयाला त्यांच्या अभंगांमधून कसे योगदान मिळाले याविषयीचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात येईल.

- **निष्कर्ष व उपसंहार**

प्रस्तुत विषयासंबंधित वरील संशोधन आराखड्याप्रमाणे निष्कर्ष या प्रकरणात येतील. त्याच बरोबर हा आराखडा प्राथमिक स्वरूपाचा असल्याने यात भाविष्यात काही बदल अपेक्षित असल्यास तसे बदल करण्यात येतील.

- **संदर्भग्रंथ सूची**

१. गीता शांकरभाष्य (हिन्दी), शंकराचार्य, गीताप्रेस गोरखपुर
२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, नासिराबाद्कर,ल.रा. फडके प्रकाशन, कोल्हापूर-२००८
३. पातंजल योगदर्शन विज्ञाननिष्ठ निरूपण, वर्तक,प.वि. ईलेकट्रो प्रिंट, पुणे २०१२
४. भगवद्गीता : यथार्थरूप, ए. सी. भक्तिवेदांत स्वामी, २०१५
५. योगदर्शन (व्यासभाष्य पर आधारित हिन्दी व्याख्या), आर्य सोमवीर, चौखम्बा सुरभराती प्रकाशन, वाराणसी
६. योग दर्शन हिन्दी-व्याख्यासहित, महर्षि पतंजली, गीताप्रेस, गोरखपुर, २००७
७. योग संहिता, स्वामी शिवानंद, डिव्हाईन लाइफ सोसायटी, १९८४
८. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, सरदार,गं.बा. न्यू एज प्रिंटींग प्रेस, मुंबई-२००४
९. श्री सकल संतगाथा भाग-१ व भाग-२, सारथी प्रकाशन, गोसावी,र.रा., सदाशिव पेठ, पुणे-२०१६
१०. श्री एकनाथ चरित्र, गोसावी श्री.ह.भ.प.रावसाहेब महाराज रंगनाथबुवा, अमेय प्रिंट, औरंगाबाद-२०२०
११. श्री संत एकनाथ महाराज गाथा भाष्य भाग-१ व भाग-२, पाटील श्री.ह.भ.प.हरिभाऊ आनंद जगनाथ महाराज पाटील, कोल्हापूर

मार्गदर्शिका:

प्रा.डॉ. कलापिनी अगस्ती,

विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग,

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक,नागपूर,महाराष्ट्र

संशोधिका:

स्वराली जोशी,

शोधछात्रा, योगविज्ञान तथा समग्र स्वास्थ्य विभाग,

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक,नागपूर,महाराष्ट्र